# प्रेमाणे पहा

प्रकाशित:

०१. अपोलो टाईम्स दिवाळी अंक २०११ .

०२ . शब्दगांधार दिवाळी अंक २०१३ .

०३. सकाळ दैनिक मुक्तपीठ .


रत्नाकर वाणी

पुनरारंभ



© पुनरारंभ



website: http://www.rajratna.co.in Email: ratnakar.wani@rajratna.co.in

# प्रेमाणे पहा

माझे पुणे नगर प्रवासा दरम्यान अनेक वाहने मला ओव्हरटेक करून गेलीत. प्रवासात टाइम पास म्हणून त्या वाहनांचे मागे लिहिलेली सूचना व बोधवाक्ये मी वाचत होतो. हम दो हमारे दो, बुरी नजर वाले तेरा मुंह काला, हे असंच चालायचं, तात्यांची पुण्याई , आईचा आशिर्वाद, ओ के फिर मिलेंगे, साईट मिलनेपर जगह दी जाएगी, जलो मगर दिपक जैसे, प्रेमाणे पहा वगैरे वगैरे. घडीभर माझी करमणूक झाली.

पण, प्रेमाणे पहा या सूचना वजा वाक्यात प्रेमाणे या शब्दात 'ने' च्या ऐवजी 'णे' हे अक्षर का वापरले यावरून मी विचार करू लागलो. कदाचित प्रेम या शब्दाकडे वाचणा-याचे लक्ष वेधून घेण्याकरिता अथवा प्रेम या शब्दाचे महत्व कळण्याकरिता असावे. खरोखरीच प्रेम ही अशी वस्तु आहे का की, जी बाजारातून खरेदी करून आणली व आता प्रेम करा व प्रेमाने पहा असा सल्ला दिला. प्रेम हे आपणहून निर्माण झाले पाहिजे. दोन व्यक्ति एकमेकाचे सहवासात आल्यावर त्यांची मने, आचार, विचार जुळल्यास आपोआप एकमेकाबद्दल सहानुभुति निर्माण होते व ओघानेच प्रेम देखिल उत्पन्न होते. त्यावेळी त्यांना कोणी सांगत नाही की प्रेम करा किंवा प्रेमाने पहा.

खरोखरीच मानवी जीवनाचा खरा आनंद घ्यायचा असेल तर प्रेम हे मोठे व महत्वाचे माध्यम मानता येइल. प्रेम घ्यावे प्रेम द्यावे प्रेमाने जग जिंकावे. प्रेम प्रत्येकाच्या हृदयात असते फक्त ते जागृत करावे लागते. संत महंत आपल्या सत्संगातून प्रवचनातून अनेक विध उदाहरणे देउन समाजात जन जागृतीचे व आपसी प्रेम उत्पन्न करण्यास प्रवृत्त करतात.

माता बालकाचे प्रेम, पिता पुत्राचे प्रेम, मित्र प्रेम, तरूण वयात तरूणांनी एकमेकावर केलेले प्रेम असे प्रेमाचे विविथ अंग आहेत. सर्वांचा उद्देश एकच जिवनात आनंद मिळविणे. माता बालकाला भरविते, त्याचे संगोपन करते, कोड कौतुक करते. तिच्या या प्रेमळ कृतीने माता बालकामथ्ये आत्मीयतेचे नाते व विशेष भावना निर्माण होते. यालाच प्रेम म्हणता येइल. माता बालकाला स्तनपान

करतांना त्याच्याकडे मायेने न्याहाळून पाहत असते, त्याला कुरवाळीत असते. यामुळे बालकामध्ये मातेच्या कुशीत सुरक्षिततेची भावना व मातेबद्दल प्रेम निर्माण होते. हीच परिस्थीती गाय वासराची. गाय पण वासरू दूध पित असतांना त्याला मायेने चाटत असते. ती पण आपल्या वासराप्रति प्रेमच प्रकट करित असते. ही जनावरांना पण निसर्गाने दिलेली निसर्गदत्त देणगीच नव्हे काय ?

पिता पुत्रांच्या प्रेमाबद्दल बोलायचे झाल्यास, पिता देखील आपल्या पुत्रावर तेवढेच प्रेम करतो जेवढे माता करते. परंतु संगोपन करतांना पित्यास प्रसंगी कठोर व्हावे लागते. याचा अर्थ असा नव्हे की पित्याचे प्रेम कमी आहे किंवा ते आटले.

दोन मित्र किंवा मैत्रिणी यांचे जेव्हां आचार विचार व मने जुळतात तेव्हां कळत न कळत ते आपल्या सुखंदुःखाच्या, एवढेच नव्हे तर खाजगी गोष्टी सुध्दा एकमेकास सांगतात. वेळेनुसार सहाय्य केले जाते, घेतले जाते व जिवा भावाचे मित्र म्हटले जातात. त्यांच्यात आपसात निर्माण झालेला जिव्हाळा, प्रेम यास मित्र प्रेम म्हणतात.

तरूण तरूणींचे तरूण वयातील आपसातील प्रेम हे सर्व साधारण असेच असते परंतु वयपरत्वे शारिरिक व अन्य कारणाने आकर्षित झालेल्या प्रेमास थोडासा वेगळाच रंग आलेला असतो. केवळ शारिरिक आकर्षणाने निर्माण झालेल्या प्रेमास प्रेम म्हणता येत नाही.

असे म्हटले जाते "अनेक योनीतून जन्म गेल्यानंतर दुर्लभ असा हा मानव जन्म प्राप्त होतो व पूर्व जन्मीच्या संचितानुसार जीवनात बरे वाईट क्षण या जन्मात भोगत असतो." जे असेल ते असो त्यावर कोणी कीती विश्वास ठेवायचा हे ज्याने त्याने आपापले ठरवायचे.

या सृष्टीमध्ये मानव प्राणी हुषार समजला जातो. कारण, त्याला निसर्गाने विचार करण्याची शक्ती प्रदान केली आहे. काय चांगले काय वाईट याचा तो पूर्ण विचार करू शकतो व सारासार विचार करून योग्य निर्णय घेउ शकतो. या दुर्लभ मानवी जिवनाचा खरा आनंद उपभोगायचा असेल तर एकमेकांबद्दल प्रेम, आदर बाळगणे व प्रेमाने वागणे हे नितांत जरूरीचे आहे. हाच संदेश जाता जाता ते वाहन सर्वाना देत तर गेले नसेलना ? भले त्यात व्याकरणिक दृष्टया काही चूक असेल.